# गरवारे बालभवनचे प्रकाशन

## पुस्तक सूची

सारसबागेसमोर, पुणे २

website: garwarebalbhavanpune.org email: info@garwarebalbhavanpune.org

दुरध्वनी : 020 24442109



### कविता कार्ड

लेखन : शोभा भागवत
चित्रकार : आभा भागवत
भाषा : मराठी
किंमत : रु. 50/-

लहान व मोठयांसाठी सहा सुंदर कवितांचा संच. शोभा ताईंच्या मूळ, आणि गुरूदेव रविंद्रनाथांच्या आणि श्री. दलाई लामा यांच्या अमर कवितांचे सहज सुंदर अनुवाद.
अतिशय समर्पक देखणी चित्र.
संग्रही ठेवावं आणि आप्तांना प्रेमाने द्यावं असं बालभवनचं प्रकाशन.

### पानांचे प्राणी

पानांशी दोस्ती करू, त्यांना नीट पाहू, कागदाच्या दुलईत निजवून ठेवू. कागदावर चिकटवून बघू काय होतं? पिंपळाच्या पानाचे उंदिर आणि फुलपाखरू होतात. पानांपासून चित्र करायला शिकवणारं आगळं पुस्तक.

लेखक : अरविंद गुप्ता
अनुवाद : शोभा भागवत
भाषा : मराठी
किंमत : रु. 25/-







### अक्षर चित्रं

लेखक : विष्णुपंत चिंचाळकर
अनुवाद : शोभा भागवत
भाषा : मराठी/इंग्रजी
किंमत : रु. 20/-


मुलांना लिहायला शिकवण्यापूर्वी अक्षरांशी खेळायला शिकवायला हवं. अक्षरात प्राणी, पक्षी, लोकं, घरं लपली आहेत. त्यांचे ह्या पुस्तकात काही नमुने दिले आहेत. ती मुलांनी पाहिली, तर त्यांना अजुन काही भन्नाट सुचेल.


अक्षरं–अंक, यांच्याशी चित्रातून दोस्ती झाली तर लेखन–वाचन सोपं जाईल त्यांना!

### अंगठ्याची चित्र

अंगठयाला लावा शाई, करू नका घाई, कागदावर हलकेच ठेवा, दाब थोडा द्यावा; आहा! किती सुंदर ठसा! जगात दुसरा नाही असा. अंगठयाच्या ठशातून किती कल्पक चित्र होतात, ते या पुस्तकात पहा आणि स्वत:च आणखी एक पुस्तक तयार करा.

लेखक: अरविंद गुप्ता
अनुवाद : शोभा भागवत
भाषा : मराठी/इंग्रजी
किंमत : रु. 20/-




### देणारं झाड

लेखक : शेल सिल्व्हरस्टाइन
अनुवाद : शोभा भागवत
भाषा : मराठी / इंग्रजी
किंमत : रु. 25/-

ही निसर्ग आणि माणूस यांच्या नात्याची गोष्ट आहे. झाडं आपल्याला फळं देतात, सावली देतात, घरांसाठी लाकूड, बोटीसाठी लाकूड, प्राणवायू, आणि कितीतरी काय काय...
आपण झाडांना काय देतो? कुऱ्हाडीचे घाव आणि आगीचे चटके. तरीही झाडं किती प्रेमळ, दयाळू असतात, ते या गोष्टीत सांगितलं आहे.
ती देतात अणि देतच राहतात.


हुषार आणि खटपटया उंदरांच्या टोळीची ही गोष्ट. ते काय करतात माहित आहे? ते एका मांजरीचा जीव वाचवतात आणि दुष्ट, कंजुष गिरणी मालकाची फजितीच करून टाकतात!

सुंदर चित्रांनी नटलेली सदाबहार गोष्ट.

## खटयाळ उंदिर

लेखक : जॉन योमैन
अनुवाद : शोभा भागवत
भाषा : मराठी
किंमत : रु. 25/-




## तूच का ग माझी आई?


लेखक : पी. डी. ईस्टमन
अनुवाद : शोभा भागवत
भाषा : मराठी/इंग्रजी
किंमत : रु. 25/-


एक चिमणीचं पिल्लू घरटयातून खाली पडतं आणि मग आपली आई शोधायला बाहेर पडतं आणि समोर येणाऱ्या प्रत्येकाला 'तूच का ग माझी आई' असं विचारतं. अगदी विमानाला आणि बोटीला सुद्धा.
सापडते का त्याची आई त्याला?

गेल्या दिडशे वर्षात पर्यावराणावर लिहिलेलं हे सुंदर पत्र आहे. गोऱ्या लोकांचं सरकार अमेरिकेतल्या मूळ आदिवासी लोकांच्या जमिनी बंदुकीच्या धाकाने हडप करणार होतं. तेव्हा आदिवासींच्या एका प्रमुखानं, चीफ सिएटल नं अमेरिकेच्या राष्ट्रपतींना हे पत्र लिहिलं. हे पत्र म्हणजे पश्चिमेच्या उपभोगवादी संस्कृतीला दिलेली एक सणसणीत चपराक आहे.

## अमर पत्र

लेखक : चीफ सिएटल
अनुवाद : शोभा भगवत
भाषा : मराठी/इंग्रजी
किंमत : रु. 25/-




## गोष्ट आलियाच्या ग्रंथालयाची


लेखक : जेनिट विंटर
अनुवाद : आभा भगवत
भाषा : मराठी/इंग्रजी
किंमत : रु. 25/-


इराकमधल्या लढाईत फक्त माणसंच मृत्युमुखी पडली नाहित, तर एक प्राचीन संस्कृतीही उध्वस्त झाली. तरीही ह्या सगळ्या संहाराच्या वातावरणात एका संवेदनाक्षम महिला ग्रंथपालानी बसराचं ग्रंथालय केवढया कसोशीने वाचवलं, त्याची ही अद्‌भुत सत्यकथा.

एक होते आजी–आजेबा. एकदा आजोबा एक मांजर शोधायला निघाले, आणि घरी घेऊन आले – मांजरांची वरात. सगळी मांजरं भांडकुदळ होती. मी हुषार, मी सुंदर ,करत त्यांनी एकमेकांना पळवून लावलं; पण या भांडणातून एक शहाणं पिल्लू वाचलं. कसं बरं ते वाचलं असेल? सुंदर, दुर्मिळ चित्रांनी सजलेलं पुस्तक.

## मांजरांची वरात

लेखकः वँडा गॅग
अनुवाद : शोभा भागवत
भाषा : मराठी/इंग्रजी
किंमत : रु. 25/-




## चित्ररूप गोष्टी


लेखकः निकोलाई रादलोव
अनुवाद : शोभा भागवत
भाषा : मराठी/इंग्रजी
किंमत : रु. 25/-

हे पुस्तक बालकेंद्री आहे. यातल्या फक्त चित्रांतून सांगितलेल्या गोष्टींमध्ये आनंद आणि आश्चर्य आहे.
या गोष्टींतून मुलांना काहीही शिकवण्याचा प्रयत्न केलेला नाही, किंवा आदर्शांचा माराही केलेला नाही.

जॉन चॅपमन या गृहस्थांनी २२५ वर्षांपूर्वी अमेरिकेच्या कानाकोपऱ्यात जाऊन सफरचंदाची लाखो झाडं लावली. लोक प्रेमाने त्यांना जॉनी ॲपलसीड म्हणू लागले. त्यांचं हे वृक्षप्रेम जगभरातल्या निसर्गप्रेमी माणसांना सदैव प्रोत्साहित करेल, प्रेरणा देईल.

## जॉनी ॲपलसीड

लेखक : अलीकी
अनुवाद : वासंती काळे
भाषा : मराठी
किंमत : रु. 30/-







## पेपरडिशची जादू

लेखक : कल्पना संचेती
भाषा : मराठी
किंमत : रु. 40/-


पेपरडिशचे कितीतरी तुकडे माझ्यासमोर पडले होते. मी ते एकमेकांना जोडून बघितले, तर काय आश्चर्य! एक गोंडस अळी त्यात मला दिसायला लागली. मी ती चिकटवली, रंगवली, सर्वांना दाखवली. सगळ्यांना खूप आवडली. हिच ती पहिली सुरूवात.


पेपरडिशपासून किती सुंदर चित्र तयार होऊ शकतात पहा.

आकृती म्हणजे हातापायांच्या बाह्यरेखांमधे प्राण्या–पक्ष्यांचे, वस्तूंचे आकार शोधायचा खेळ. या पुस्तकामधली चित्र काढता काढता तुम्हालाही प्रतीचित्रणातून खूप काय काय चिताराता येईल.
जरूर संग्रही असावं असं पुस्तक.

## आकृती

लेखक, चित्रकार : आभा भागवत
भाषाः मराठी/इंग्रजी
किंमत : रु. 120/-




## आपले अभयारण्य

लेखक : मृणालिनी वनारसे
चित्रं : मधुरा पेंडसे
भाषा : मराठी
किंमत : रु. 100/-


घराशेजारचे अभयारण्य? शक्यच नाही. जंगल असतं दूर कुठेतरी. वाघ, बिबटे आणि हत्ती जिथे असतात, त्याला जंगल म्हणतात. शहरात कुठे आलंय जंगल? घराजवळच्या रिकाम्या, तण माजलेल्या जागेत काय मजा येणार आहे?
पिनूला मात्र असं जंगल त्याच्या घराजवळ सापडलं. काय आहे हे अभयारण्य? बघूया तर खरं... कदाचित आपल्यालाही आपल्या घराजवळ असचं एखादं अभयारण्य सापडेल...

मुलांना त्यांच्या रम्य बालपणात नेणारं, निसर्गाशी जवळीक साधणारं हे कवितांचं पुस्तक आहे. यात लहानांना पडणारे प्रश्न आहेत, निसर्गाशी जवळीक आहे, सूर्याला दिलेला सल्ला आहे. एक छान निरागस मूल या कवितांत खेळतं आहे. या कवितांना मुलांच्या अधिक जवळ नेणारी वेगळ्या शैलीतली चित्र या पुस्तकात आहेत. मुलांना ती चित्रकलेबद्दल वेगळा विचार करायला प्रवृत्त करतील.

## जादूच जादू इथे सारी

कविता : डॉ. कौमुदी गोडबोले
चित्र : आभा भगवत
भाषा : मराठी
किंमत : रु. 120/-




## ओळखा आम्ही कोण?

लेखक, चित्रकार :
आभा भागवत
भाषा : मराठी/इंग्रजी
किंमत : रु. 30/-

प्राण्यांच्या सावलीवरून प्राणी कोणाला ओळखता येतील?
आई, बाबा आणि पिल्लू अशी प्राण्यांची कुटुंब या पुस्तकात दाखवली आहेत. काही प्राण्यांच्या पायाचे ठसे दाखवले आहेत. ते कसे असतात हे समजेल, आणि ठसे ओळखण्याचा खेळही खेळता येईल.

शरिराच्या वाढीसाठी जेवण लागतं, तसं बुद्धीच्या विकासासाठी वाचन. म्हणून वाचायला शिका आणि पुस्तकांशी मैत्री करा. पुस्तकं तुम्हाला खूप आनंद आणि उत्साह देतील. पुस्तकांत तुम्ही एलिस बरोबर अद्भुत प्रदेशाची सफर करून याल आणि रॉबिनहूड बरोबर लांबवरच्या देशात हिंडून याल.

## वाचणं किती मजेचं

लेखक : मन्रो लीफ
अनुवाद : कल्पना संचेती
भाषा : मराठी
किंमत : रु. 25/-







## पाच चिनी भाऊ


लेखकः क्लेअर हचिट बिशप
अनुवाद : नेहा सुगवेकर
भाषा : मराठी
किंमत : रु. 25/-


पाच चिनी भाऊ होते. ते दिसायला अगदी एकसारखे होते. एका भावाला विनाकारण फाशीची शिक्षा होते. त्यावेळी दुसरा भाऊ त्याच्या जागी जातो. प्रत्येक भावाचा एक गुण असतो. त्यामुळे प्रत्येक वेळी एकेक भाऊ वाचतो. शेवटी सगळे जण त्यांच्या आईबरोबर मजेत राहतात. अशी ही छान गोष्ट मुलांना फार आवडेल.

आपल्या देशाप्रमाणेच आफ्रिकेतल्या गावांवधे लोक मिळून मिसळून राहतात. सगळं गाव म्हणजे एक कुटुंब असतं. त्याच एकोप्याची ही गोष्ट आहे.
आफ्रिकेत एक म्हण आहे, 'एका मुलाला वाढवायचं तर सारं गाव लागतं.' कोकू नावाच्या मुलाची ही गोष्ट हेच सांगते.

## मूल–साऱ्या गावाचं

लेखक : जेन कोवेन फ्लेचर
अनुवाद : शोभा भागवत
भाषा : मराठी
किंमत : रु. 100/-




## गोष्टी तारा आणि नीलच्या


लेखकः सोनाली घैसास
चित्रं : केतकी घैसास
भाषा : मराठी/इंग्रजी
किंमत : रु. 100/-


हे एका कुटुंबाने प्रेमाने त्यार केलेलं पुस्तक आहे. घरात घडलेले प्रसंग, ज्यात मजा होती आणि मुलीला मिळालेला नवीन अनुभव होता. ते गोष्टीरूपाने आईने लिहून काढले, मुलीने सुंदर चित्रं काढली आणि बाबाने पुस्तकाचं डिझाईन केलं.

जीवनातल्या छोटया गोष्टीही प्रगल्भतेनं रस घेऊन करणं हा गांधीजींच्या व्यक्तिमत्वाचा पाया होता. ते कष्टाची सर्व कामं आनंदाने करत. सूतकताई, शिवणकाम, स्वयंपाक, साफसफाई, आजाऱ्याची सुश्रुषा, शेतकी, कपडे धुणं वगैरे. कुठल्याही कामाची त्यांना लाज वाटत नसे. ते वकिल, लेखक, मुद्रक, प्रकाशकही होतेच. ते म्हणत, नुसतं पुस्तकी शिक्षण देण्यापेक्षा त्याबरोबर मुलांना उत्तम स्वयंपाक आणि साफसफाई करायला शिकवणारी शाळा आदर्श. गांधीजींच्या स्वभावाचे अनेक पैलू हे पुस्तक उघडून दाखवतं.

## बहुरूप गांधी

लेखक : अनु बंदोपाध्याय
अनुवाद : शोभा भागवत
भाषा : मराठी
किंमत : रु. 150/-




## फ्री अ‍ॅट लास्ट

लेखक : डॅनियल ग्रीन बर्ग
अनुवाद : नीलांबरी जोशी
भाषा : मराठी
किंमत : रु. 200/-

१९६० च्या दशकात डॅनियल ग्रीनबर्ग यांनी अमेरिकेत बोस्टन जवळ सडबरी व्हॅली नावाची शाळा सुरू केली. त्यात पाठयक्रम नव्हता, वर्ग नव्हते, गुण नव्हते, गणवेश, घंटा काही नव्हतं. मुलं 'त्यांची ती' असू शकायची, स्वतःच्या शिक्षणाची जबाबदारी घ्यायची.
मुलं स्वतःच्या भविष्याची शिल्पकार ठरायची.
या अद्भुत शाळेची साध्या सोप्या शैलीत सांगितलेली गोष्ट.

## वाचनाविषयी सर्वकाही

लेखक : कालिदास मराठे

भाषा : मराठी
किंमत : रु. 200/-




मराठी वाचनाचा ध्यास घेतलेल्या, आणि तिचं संवर्धन व्हावं यासाठी अतिशय प्रयत्नशील असणाऱ्या लेखकाने जमवलेला लेख, कविता, पुस्तकांच्या याद्या, सुविचार, उपक्रम, बातम्या यांचा वाचनीय आणि आटोपशीर संग्रह म्हणजे हे पुस्तक. प्रत्येक मराठी प्रेमी माणसाकडे आणि ग्रंथालयात असावंच असं.



## झुळ झुळ गाणी

ऑडिओ सी.डी.

किंमत : रु. 100/-

मुलांच्या विश्वातील सुंदर कवितांची आणि गाण्यांची सी.डी.

शांता शेळके, श्यामला वनारसे, सरिता पदकी, शोभा भागवत, गावंडे गुरूजी यांच्या आणि इतरही सुंदर कविता आणि गाणी.